# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः16.05.2024** **वारःगुरुवार**

---

1.लोकसभा निवडणुकीतील उर्वरित टप्प्यासाठी विविध पक्षांचे नेते जोरदार सक्रिय.
2.नागरिकत्व सुधारणा नियम 2024 च्या अधिसूचनेनंतर " नागरिकत्व प्रमाणपत्रांचा " पहिला संच वितरित.
3. स्लोव्हाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांच्यावर गोळीबार. प्रकृती चिंताजनक.
4.भालाफेकपटू नीरज चोप्राने भुवनेश्वर फेडरेशन करंडक स्पर्धेत पटकावले सुवर्णपदक. आणि
5.उत्तरेकडील राज्यांमध्ये उष्णतेची नवीन लाट, नैऋत्य मान्सून रविवारी दक्षिण अंदमान आणि निकोबार बेटांवर पोहोचण्याची शक्यता

**प्रचार-पूल**
लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या, सहाव्या आणि सातव्या टप्प्यासाठी विविध पक्षांचे नेते प्रचार करत आहेत. पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी इथं निवडणूक सभेला संबोधित केलं. यावेळी बोलताना मोदी म्हणाले की, ''कोविड महामारीच्या काळात देशाने केलेल्या कामाचं जगाने कौतुक केलं आहे.'' सुलभ आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नाशिकच्या गावागावात ६०० हून अधिक आयुष्मान आरोग्य मंदिर आणि अनेक जनऔषधी केंद्रं स्थापन करण्यात आल्याचं मोदी यांनी आवर्जून सांगितलं; तर कल्याणमध्ये झालेल्या मेळाव्याला संबोधित करताना मोदी यांनी देशाच्या 2047 च्या स्वप्नाला गती देईल अशा स्वरूपाचा पाया तयार करायचा आहे असं सांगितलं. त्यानंतर त्यांनी मुंबईत पथ फेरी देखील काढली.

विविध राजकीय पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी आणि स्टार प्रचारकांनी काल उत्तरप्रदेशात प्रचार केला. भाजपचे ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह यांनी मोहनलालगंज मतदारसंघातून निवडणूक लढवणारे पक्षाचे उमेदवार आणि केंद्रीय मंत्री कौशल किशोर यांचा प्रचार केला. एनडीए सरकार देशातील गरीब लोकांची काळजी घेते, म्हणूनच आयुष्मान हेल्थ कार्डसारख्या कल्याणकारी योजना सुरू करण्यात आल्याचं राजनाथसिंह यावेळी म्हणाले. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही हमीरपूर मतदारसंघातील सभेला संबोधित केले. ते म्हणाले, भाजप सरकार सत्तेत आल्यापासून भ्रष्टाचार आणि बिघडलेली कायदा आणि सुव्यवस्था असे कोणतेही प्रश्न राहिलेले नाहीत. त्यांनी महोबा जिल्ह्यात आणि झाशी मतदारसंघात पथ फेरीचे नेतृत्व केले.
बहुजन समाज पक्षाच्या सर्वेसर्वा मायावती यांनी बुंदेलखंड प्रदेशातील बांदा मतदारसंघात एका सभेत बोलताना महागाई आणि बेरोजगारी या मुद्यांवरुन भाजपावर हल्लाबोल केला. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनीही सहाव्या टप्प्यातील पोटनिवडणूक होणाऱ्या बलरामपूर जिल्ह्यातील गैनसाडी विधानसभा मतदारसंघातील राजकीय सभेत भाजपा भांडवलदारांसाठी काम करत असल्याची टीका केली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू आणि काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी यांनी काल रायबरेलीमध्ये राहुल गांधींचा प्रचार केला.

ओडिशामध्ये, या महिन्याच्या 20 आणि 25 तारखांना तसंच 1 जून रोजी मतदानाच्या उर्वरित तीन टप्प्यांसाठी भाजपा, काँग्रेस आणि बीजेडीच्या सर्व प्रमुख नेत्यांसह लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांसाठी प्रचार जोरात सुरू आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनीही काल दुचाकी फेरीत सहभाग घेऊन बालंगीर इथं निवडणूक सभेला संबोधित केले.

**सीए**
नागरिकत्व सुधारणा नियम 2024 च्या अधिसूचनेनंतर " नागरिकत्व प्रमाणपत्रांचा'' पहिला संच काल प्रदान करण्यात आला. केंद्रीय गृहसचिव अजय कुमार भल्ला यांनी नवी दिल्लीत १४ अर्जदारांना नागरिकत्व प्रमाणपत्रं दिली. गृह मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, इतर अनेक अर्जदारांना ईमेलद्वारे डिजिटल स्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र दिले जात आहेत.

भल्ला यांनी अर्जदारांचे अभिनंदन करत नागरिकत्व सुधारणा नियम, 2024 ची ठळक वैशिष्ट्यं अधोरेखित केली. 11 मार्च 2024 रोजी ही वैशिष्ट्यं अधिसूचित करण्यात आली होती. या नियमांनुसार 31 डिसेंबर 2014 पर्यंत पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमधून भारतात प्रवेश केलेल्या हिंदू, शीख, जैन, बौद्ध, पारशी आणि ख्रिश्चन समुदायातील व्यक्तींकडून अर्ज प्राप्त झाले होते.
हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण विविध भारतीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**स्लोवाकिया**
स्लोव्हाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांच्यावर काल गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. त्यांच्यावर तीन तासांची शस्त्रक्रिया करण्यात आली, मात्र अद्यापही त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचं संरक्षण मंत्री रॉबर्ट कालिनाक यांनी म्हटलं आहे. तर ही घटना म्हणजे देशावर हल्ला असल्याचं गृहमंत्री माटुस सुताज एस्टोक यांनी

म्हटलं आहे. हा हल्ला लोकशाहीवर झाला असून परिस्थितीचं मूल्यांकन करण्यासाठी आज सुरक्षा परिषदेची बैठक बोलावण्याचं आवाहन उपपंतप्रधानांना करणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. दरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनीही फिको यांच्यावरील गोळीबाराचा निषेध केला आहे. कथित हल्लेखोराला घटनास्थळी ताब्यात घेण्यात आलं असून अधिकृतपणे अद्याप त्याची ओळख पटलेली नाही. एका सरकारी बैठकीनंतर एका सांस्कृतिक कार्यक्रमात फिको यांच्यावर हल्ला करण्यात आला.

**कान**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू आणि फ्रान्स आणि मोनॅको येथील भारताचे राजदूत जावेद अश्रफ यांनी काल फ्रान्समधील “कान चित्रपट महोत्सव 2024” मध्ये भारतीय दालनाचं उद्घाटन केलं. या महोत्सवात पहिल्यांदाच “भारत पर्व” आयोजित करण्यात आलं आहे. या माध्यमातून विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी भारतीय चित्रपट समुदायाला एक व्यासपीठ उपलब्ध होत आहे. या दालनाची रचना अहमदाबाद इथल्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन या संस्थेने केली आहे. “क्रिएट इन इंडिया” असा या वर्षीचा विषय असून त्याला “सूत्रधारा” असं नाव देण्यात आलं आहे.

**इंडिया**

‘दी इंडिया स्किल्स २०२४’ या देशातील सर्वात मोठ्या कौशल्य स्पर्धेला काल नवी दिल्ली इथं सुरुवात झाली. पुढील चार दिवसांत, 30 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील 900 हून अधिक विद्यार्थी, पारंपारिक हस्तकलेपासून ते नवीनतम तंत्रज्ञानापर्यंतच्या 61 विविध क्षेत्रांमध्ये त्यांचे कौशल्य प्रदर्शित करतील. ही स्पर्धा म्हणजे तरुणांसाठी तसेच उद्योगांसाठी चांगली संधी असल्याचं कौशल्य विकास सचिव अतुल कुमार तिवारी यांनी या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी म्हटलं आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना, येत्या सप्टेंबरमध्ये फ्रान्समधील ल्योन इथं होणाऱ्या जागतिक कौशल्य स्पर्धेत सहभागी झोण्याची संधी मिळणार आहे.

**सिक्कीम**

सिक्कीम आज आपला ४९वा स्थापना दिन साजरा करत आहे. 16 मे 1975 रोजी संसदेनं घटनादुरुस्ती करून, 22 वं राज्य म्हणून सिक्कीमचा भारतात समावेश करण्यात आला. राज्यपाल, लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी या प्रसंगी सिक्कीमच्या जनतेला हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. राज्याच्या 49 वर्षांच्या लोकशाही प्रवासात सिक्कीममध्ये विविध क्षेत्रात लक्षणीय विकास झाला आहे. मुख्यमंत्री प्रेमसिंग तमांग यांनीही सिक्कीमची प्रगती अधोरेखित करत शुभेच्छा दिल्या आहेत. सिक्कीमचा सांस्कृतिक वारसा जतन करणं, जीवनमान सुधारणं आणि शिक्षण, आरोग्य सेवा आणि तांत्रिक प्रगती यांना चालना देण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला.

**विद्यापीठ परीक्षा**

सामायिक विद्यापीठ प्रवेशासाठी काल घेण्यात आलेल्या CUET (UG)-2024 परीक्षेच्या पहिल्या दिवशी 75 टक्क्यांहून अधिक उमेदवार उपस्थित होते. राष्ट्रीय चाचणी संस्थेनं दिलेल्या माहितीनुसार, ही परीक्षा देशात आणि परदेशातील सर्व ठिकाणी सुरळीतपणे पार पडली. यावर्षी परीक्षेच्या पहिल्या दिवशी 11 लाख 4 हजार उमेदवार 379 शहरांमधील दोन हजार एकशे 57 केंद्रांवर परीक्षा देणार होते. NTA नं सांगितलं की दिल्ली केंद्रावरील परीक्षा अपरिहार्य कारणांमुळे पुढे ढकलण्यात आली असून ती आता 29 मे रोजी होणार आहे. केंद्रीय विद्यापीठं किंवा देशभरातील सरकारी, तदर्थ आणि खासगी विद्यापीठांसह इतर संस्थांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा एक खिडकी संधी असते.

**राजस्थान**

राजस्थानमध्ये नीम का थाना मधल्या खेत्री इथल्या खाणीत अडकलेल्या हिंदुस्थान कॉपर लिमिटेडच्या १४ अधिकाऱ्यांची काल सकाळी सुखरूप सुटका करण्यात आली. मात्र एका अधिकाऱ्याचा मृत्यू झाल्याचे आढळून आलं आहे. खाणीची लिफ्टची केबल तुटल्याने हा अपघात झाला होता.

**मप्र-वाहनअपघात**

मध्य प्रदेशातील इंदूर जिल्ह्यात काल रात्री उशिरा दोन वाहनांच्या धडकेत आठ जण ठार तर एक जण जखमी झाला. अतिरिक्त पोलीस अधीक्षक रूपेश कुमार द्विवेदी यांनी दिलेल्या माहितीनुसार, इंदूर-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर एका जीपला अज्ञात वाहनानं धडक दिली. अपघातानंतर अज्ञात वाहनाचा चालक पळून गेल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**नीरजचोप्रा**

पुरुषांच्या भालाफेकमध्ये ऑलिम्पिक विजेता भारतीय खेळाडू नीरज चोप्राने काल भुवनेश्वर इथं फेडरेशन कप 2024 मध्ये सुवर्णपदक पटकावलं आहे. नीरज तीन फेऱ्यांनंतर दुसऱ्या स्थानावर होता. त्याने चौथ्या फेरीत ८२ पूर्णांक २७ मीटर भाला टाकत आघाडी घेतली. नीरजने यापूर्वी 2021 मध्ये याच स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते.

**उष्णतालाट**

राजस्थान, पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये उष्णतेची नवीन लाट येण्याची शक्यता आहे. भारताच्या पूर्व आणि उत्तर-पूर्व भागात आज उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता असून, पुढील चार दिवसांत वायव्य आणि पूर्व भारतातील अनेक भागांमध्ये कमाल तापमानात ३ ते ४ अंश सेल्सिअसने वाढ होईल, असल्याचं हवामान खात्यानं म्हटलं आहे. येत्या दोन दिवसांत गुजरात, कोकण, सौराष्ट्र आणि कच्छमध्ये भीषण उष्णतेची शक्यतादेखील हवामान खात्याने वर्तवली आहे. नैऋत्य मान्सून रविवारी दक्षिण अंदमान समुद्र, आग्नेय बंगालच्या उपसागरातील काही भाग आणि निकोबार बेटांवर पोहोचण्याची शक्यता आहे. तमिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, केरळ, माहे आणि कर्नाटकमध्ये रविवारपर्यंत मुसळधार पाऊस कायम राहण्याची शक्यता आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**